# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या सहाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१६ मार्च, २०१३ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची सहावी सभा दि.१६ मार्च, २०१३ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मालदार एन. एन.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. - संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ.चिट्टे जी.एन. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ.देशमुख ए.एल. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| ९) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| १०) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १३) | प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. | सदस्य |
| १६) | प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए. | सदस्या |
| १७) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १८) | श्री. आदटराव एम. एन. | सदस्य |
| १९) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. | सचिव |
| २०) | डॉ. अवताडे एच. के. | सदस्य |
| २१) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| २२) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २३) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २४) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| २५) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २६) | डॉ. गायकवाड सयाजीराव पांडूरंग | सदस्य |
| २७) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २९) | डॉ.बारबोले ए.एन. | सदस्य |
| ३०) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३१) | डॉ. श्रीमती दळवी आर.जे. | सदस्या |
| ३२) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३३) | डॉ. श्रीमती आपटे एस. एस. | सदस्या |
| ३४) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३५) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३६) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ३७) | श्री. गायकवाड संपतराव पांडूरंग | सदस्य |
| ३८) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ३९) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ४०) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ४१) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४२) | श्री. सलगर बी.एस. | सदस्य |
| ४३) | श्री. जमादार के.एम. | सदस्य |
| ४४) | श्री. वडगावकर पी. पी. | सदस्य |
| ४५) | श्री. रुपनर बी. ए. | सदस्य |
| ४६) | श्री. वाघमोडे एस. एम. | सदस्य |
| ४७) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४८) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४९) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ५०) | डॉ. अशोककुमार ई. एन. | सदस्य |
| ५१) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ५२) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ५३) | डॉ. जोशी पी. बी. | सदस्य |
| ५४) | डॉ. कृष्णमूर्ती एम. | सदस्य |
| ५५) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ५६) | डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. | सदस्या |
| ५७) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५८) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५९) | डॉ. नारायणपेठकर ए. बी. | सदस्य |
| ६०) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६१) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |
| ६२) | श्री. बारबोले ए. ए. | सदस्य |
| ६३) | श्री. भांगे झेड. बी. | सदस्य |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. मा.कुलगुरु यांच्या नियुक्तीनंतरची व मा. संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या निवडीनंतरची अधिसभेची ही

पहिलीच सभा असल्याने त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला तसेच श्री. झुंजार भांगे यांचे जिल्हा परिषद शिक्षण समिती सदस्यांमधून मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशन केल्यानंतरची ही पहिलीच सभा असल्याने त्यांचे स्वागत करुन सभागृहाला ओळख करुन देण्यात आली.

**<u>अनुपस्थिती :</u>**

डॉ. संजय नवले संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ, श्री. गांधी आर. एच., श्री. दिपक साळुंखे-पाटील, डॉ. गेंगजे एस. आर., श्री. डोंगरे एम. एस. यांनी पत्राद्वारे आणि डॉ. रोंगे बी. पी. व श्री. व्हनकळस डी. डी. यांनी दूरध्वनीवरुन अधिसभेच्या या सभेस अनुपस्थित राहण्यासंबंधी कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना पाचवी अधिसभा व सहावी अधिसभा बैठक या दरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर यांचा कुलगुरु पदावरील कार्यकाल दि.२५/११/२०१२ रोजी संपल्याने ते सेवानिवृत्त झाले.
- दि.२६/११/२०१२ ते दि.११/१२/२०१२ अखेर प्रभारी कुलगुरु म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु मा. प्रा. डॉ. एन. जे. पवार यांनी कामकाज पाहिले.
- रसायनशास्त्र संकुलातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. एन. एन. मालदार यांची महामहिम कुलपती श्री. के. संकरनारायणन् यांनी सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली. दि.११/१२/२०१२ रोजी डॉ. एन. एन. मालदार यांनी कुलगुरु पदाचा कार्यभार स्वीकारला.
- विद्यापीठस्तरीय आविष्कार महोत्सव सांगोला महाविद्यालय, सांगोला येथे दिनांक २२ व २३ डिसेंबर, २०१२ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर महोत्सवात एकूण ३०७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यापैकी एकूण ४६ विद्यार्थ्यांची निवड राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवासाठी झाली. सदर राज्यस्तरीय महोत्सव बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे दि.०७/०१/२०१३ ते ०९/०१/२०१३ दरम्यान पार पडला.
- दि.२४/१२/२०१२ ते दि.२६/१२/२०१२ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे उत्कर्ष २०१३ चे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेमध्ये सोलापूर विद्यापीठातून १० मुले व ८ मुली असा संघ सहभागी झाला. सदर स्पर्धेत विद्यापीठाला ३ सुवर्ण, ३ कास्य आणि ४ विशेष पारितोषिके अशी एकंदर १० पारितोषिके मिळाली. सलग चौथ्यावर्षी पथनाट्यामध्ये हॅट्ट्रीक करुन विद्यापीठाने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले.

- २८ व्या पश्चिम विभागीय युवा महोत्सव वीर नर्मदा साऊथ गुजरात विद्यापीठ, सुरत येथे दि.२६/१२/२०१२ ते दि.३१/१२/२०१२ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर महोत्सवामध्ये विद्यापीठाचा एकूण ४० विद्यार्थी व विद्यार्थिनींचा संघ सहभागी झाला. विद्यापीठास एकूण चार बक्षिसे मिळाली.

- दि.२८/१२/२०१२ रोजी प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंद्रुप यांची सोलापूर विद्यापीठाच्या संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या पदावर नेमणूक होऊन त्यांनी दि.०१/०१/२०१३ रोजी कार्यभार स्वीकारला.

- दि.०१/०१/२०१३ रोजी डॉ. बी. एन. कांबळे हिराचंद नेमचंद महाविद्यालय, सोलापूर यांची विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयक या पदावर नेमणूक होवून त्यांनी सदर पदाचा कार्यभार स्वीकारला.

- प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व विभागाच्या वतीने दक्षिण सोलापूर तालुक्यातील कारकल या गावात डॉ. श्रीमती माया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०९/०१/२०१३ ते दि.१५/०२/२०१३ या कालावधीत उत्खनन करण्यात आले व इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील मौर्य सातवाहन काळातील संस्कृतीचा शोध लावला.

- दि.०८ ते ११ जानेवारी, २०१३ या दरम्यान मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण सहसंचालनालय, सोलापूर विभाग यांच्यामार्फत पडताळणी पथकाने विद्यापीठाच्या स्थापनेपासून वेतन अनुदानाची सर्वंकष पडताळणी करण्यात आली.

- दि.१७ ते २१ जानेवारी, २०१३ या कालावधीत महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स, हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॅण्डबॉल इत्यादी संघांमध्ये एकूण ७२ मुले व ७२ मुली आणि १२ संघव्यवस्थापक यांनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. सदर स्पर्धेमध्ये हॅण्डबॉल मुलांच्या संघाने सुवर्ण पदक प्राप्त केले, ॲथलेटिक्समध्ये लांब उडी या क्रीडा प्रकारात श्री. देशपांडे प्रथमेश यास ब्रांझ पदक, कु. अमरजा होठे हिला ॲथलेटिक्स मध्ये तिहेरी उडी या क्रीडा प्रकारामध्ये ब्रांझ पदक मिळाले. तसेच इतर संघानेही उत्कृष्ट कामगिरी केली.

- पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हॅण्डबॉल मुले / मुली संघ स्पर्धेसाठी जय नारायण व्यास विद्यापीठ जोधपूर येथे रवाना झाला.

- गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ धनुर्विद्या स्पर्धेत कु. अनुराधा पाटील हिने इंडियन राऊंड ५० मीटर मध्ये सुवर्ण पदक मिळविले.

- Cultural Appreication for National Integratiaon camp दि.१२ ते १८ जानेवारी, २०१३ दरम्यान Duddupundi Women's College, Sindhanur (Riachur Dist.)

Karnataka याठिकाणी आयोजित केला होता. सदर कॅम्पमध्ये सोलापूर विद्यापीठाने सहभाग नोंदविला.

- सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व डॉ. अनंत ॲण्ड लता लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमाला दि.२४/०१/२०१३ रोजी मा. डॉ. द. ना. धनागरे माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे "लिंगभावावर आधारित स्त्री-पुरुष असमानता आणि सामाजिक विषमता" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

- सोलापूर विद्यापीठामध्ये दि.२६/०१/२०१३ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमास विद्यापीठातील विद्यार्थी / विद्यार्थिनी, सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

- दि.२६/०१/२०१३ रोजीच्या राजपथ दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनासाठी परेड करिता संगमेश्वर महाविद्यालयातील श्री. सागर कृष्णात कासार या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि श्री. सिद्धेश्वर थोरात, एन. एन. सी. कॅडेट, के. बी. पी. महाविद्यालय, पंढरपूर यांची निवड झाली.

- सोलापूर विद्यापीठ व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने "युवा नेतृत्व विकास शिबीर" दि.२९/०१/२०१३ रोजी संपन्न झाले.

- २८ वा राष्ट्रीय स्तरीय युवा महोत्सव कल्याणी विद्यापीठ कोलकाता पश्चिम बंगाल येथे दि.०५/०२/२०१३ ते दि.०९/०२/२०१३ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. सदर युवा महोत्सवात सोलापूर विद्यापीठातून चार स्पर्धक व एक संघव्यवस्थापक सहभागी झाले.

- दि.०२/०२/२०१३ रोजी शिक्षणशास्त्र संकुलाकडे एक दिवसीय संशोधन विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ६९ मान्यवरांनी सहभाग नोंदविला तर एकूण ०४ तज्ञ व्यक्तींची व्याख्याने झाली.

- दि.०२/०२/२०१३ रोजी वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाकडे Operation Research and Research Methodology या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ३१ शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

- विशेष कक्ष विभागातर्फे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित व संख्याशास्त्र इत्यादी विषयांची नेट सेट परीक्षा प्रशिक्षण शिबीर दि.०२/०२/२०१३ रोजी संपन्न झाले.

- ॲप्लाईड इकॉनॉमिक्स या विभागाच्या वतीने दि. १० ते १२ फेब्रुवारी, २०१३ दरम्यान विद्यार्थी व शिक्षकांसाठी तीन दिवसीय कार्यशाळा Econometric and Mathematical Economics या विषयावर आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी लाभ घेतला.

- सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, जिल्हा परिषद, सोलापूर, ग्रामपंचायत मोडनिंब, रोटरी क्लब, मोडनिंब आणि मा. ह. महाडीक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन दि.०१/०२/२०१३ ते

दि.१०/०२/२०१३ या दरम्यान मोडनिंब या ठिकाणी करण्यात आले. यामध्ये ७० महाविद्यालयातील ३०२ विद्यार्थी व २१ संघानी सहभाग नोंदविला.

- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त दि.१२/०२/२०१३ रोजी श्री. सुधीर गव्हाणे, माजी प्रभारी कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे "कै. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची आजच्या संदर्भात प्रेरकता" या विषयावर व्याख्यान सोलापूर विद्यापीठाच्या सभागृहात संपन्न झाले.

- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी दि.१६/०२/२०१३ रोजी औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या University-Industry Innovation Summit मध्ये प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. एस. बी. महाडीक, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल व संलग्नित महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

- रसायनशास्त्र संकुलातील प्राध्यापक डॉ. एस. व्ही. लोणीकर, समन्वयक सेट आणि इतर प्राध्यापकांनी पुणे विद्यापीठामार्फत दि.१७/०२/२०१३ रोजी घेण्यात आलेल्या SET परीक्षेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले.

- भूशास्त्र विभागाची (Applied Geology) अभ्यास सहल दि.१८/०२/२०१३ ते दि.२८/०२/२०१३ या कालावधी दरम्यान आयोजित करण्यात आली. त्यावेळी गुंतकल, कडाप्पा, रेणीगुंठा, विजयवाडा आणि हैद्राबाद इत्यादी ठिकाणी भेटी देण्यात आल्या.

- नेहरु युवा केंद्र संगठन, सोलापूर व पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने "छेडछाड छोडो यार" या विषयावर संमेलन दि.२३/०२/२०१३ रोजी शिवस्मारक सभागृह, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले. या संमेलनामध्ये मत मांडण्यासाठी सोलापूर शहरातील राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित महाविद्यालयातील एकूण २०० स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

- पीएच.डी. कोर्सच्या सर्व विषयाच्या परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

- ३९ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले संशोधन प्रकल्प विद्यापीठ अनुदान आयोग कार्यालय पुणे यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले.

- संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन झाले असून त्यांना "ब" मानांकन प्राप्त झाले. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाचे नॅक पुनर्मुल्यांकन झाले असून त्यांना "अ" पुनर्मुल्यांकन प्राप्त झाले.

- शासनाने सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त विभागातील विद्यार्थ्यांसाठी जाहीर केलेल्या योजनेसाठी माहिती पाठविण्यात आली.

- मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, सोलापूर यांच्याकडून विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ₹२७,६०,२८८/- इतकी रक्कम शुल्कापोटी प्राप्त झालेली आहे.

- विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून विद्यापीठास १२ ब चा दर्जा मिळविण्याकरिता विहित नमुन्यात सुधारित ४० पानी फेर प्रस्ताव जानेवारी २०१३ मध्ये सादर करण्यात आला. या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्लीच्या तज्ञ समितीने नियोजित कार्यक्रमानुसार दि.०१ व ०२ मार्च, २०१३ रोजी विद्यापीठास भेट देवून प्रत्यक्ष पाहणी केली. सदर पाहणीकरिता पूर्व तयारीसाठी विद्यापीठातील सर्व अधिकारी, शिक्षक वृंद, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी अथक परिश्रम घेऊन उत्कृष्ट संघ भावनेने विद्यापीठाची योग्य प्रतिमा तज्ञ समितीसमोर मांडली.

- परीक्षेच्या कामात ज्या प्राध्यापकांकडून व विद्यार्थ्यांकडून गैरप्रकार झाले आहेत अशा संबंधितांना परीक्षा प्रमाद समितीने केलेल्या दंडाच्या शिफारशीस परीक्षा मंडळाने मान्यता दिलेली असून त्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

- विशेष कक्ष विभागाकडे सहाय्यक प्राध्यापक पदासाठी एकूण ८०५ इतक्या मागासवर्गीय उमेदवारांनी आजतागायत नावनोंदणी केली आहे.

- सोलापूर विद्यापीठास खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त / मंजूर झाले.
    - थकीत वेतन अनुदान ₹३,७२,००,०००/- पैकी ₹२,८७,८१,०००/- प्राप्त झाले.
    - यु.जी.सी. नॉन १२ (ब) ₹२,५०,००,०००/- प्राप्त झाले.
    - ४८२ एकर संपादित जमीन नुकसान भरपाई ₹१,३८,५९,१३८/- मंजूरीबाबतचा शासन निर्णय निर्गमित.
    - कला व भाषा इमारत बांधकामाकरिता उर्वरित निधी ₹११,४८,६६०/- मंजूरीबाबतचा शासन निर्णय निर्गमित.
    - महाराष्ट्र शासन नॉन १२ (ब) मॅचिंग निधी ₹२,५०,००,०००/- मिळविण्याकरिता प्रयत्न करीत आहोत.

- मा. श्री. जे. पी. डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र वित्त आयोग (४था) यांनी विद्यापीठास दि.०६ मार्च, २०१३ रोजी भेट दिली.

- महाराष्ट्र शासनाने विशेष आतिथ्य दर्जा दिलेल्या दक्षिण कोरियाच्या ३० जणांच्या डेलिगेटस्‌ची सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर दि.१९ व २०/०२/२०१३ दरम्यानच्या भेटीदरम्यान या डेलिगेटस्‌नी विद्यापीठास भेट देवून विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

- दि.०८/०३/२०१३ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून श्रीमती मनिषा दुबुले, उपविभागीय पोलीस अधिकारी, ग्रामीण विभाग, सोलापूर यांचे "महिला आणि पोलीस" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

- पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन महोत्सवाचे आयोजन पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि.२३ ते २५ फेब्रुवारी, २०१३ दरम्यान करण्यात आले होते. या संशोधन महोत्सवात ४ संशोधक विद्यार्थी व १ संघव्यवस्थापक सहभागी झाले होते.
- राष्ट्रीय विज्ञान दिन फेब्रुवारी २०१३ च्या शेवटच्या आठवड्यात साजरा झाला.

सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] अधिसभेच्या दि.२० नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या पाचव्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

(टिपणीः सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/१०३९०, दि.२६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये, दि.२० नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या पाचव्या सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२६/१२/२०१२ अशी होती. मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, प्रशासनाकडून एक दुरुस्ती सुचविण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे :

**दुरुस्तीः विषय क्र. १) "अधिसभेच्या दि.२४ मार्च, २०१२ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे" ऐवजी "अधिसभेच्या दि.२४ मार्च, २०१२ रोजी झालेल्या चौथ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे" अशी दुरुस्ती करावी.**

सबब, वरील दुरुस्तीसह अधिसभेचा दि.२० नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या पाचव्या सभेचा कार्यवृतांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

**ठरावः अधिसभेच्या दि.२० नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या पाचव्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून वरील दुरुस्तीसह कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.
(टिपणीः परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र सोबत जोडले आहे).

**ठरावः अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:२० वाजता सुरु झाला व प्रश्नोत्तरे संपल्याने दुपारी १२:३४ वाजता प्रश्नोत्तराचा तास संपला.**
**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**

[ ३ ] विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

श्री. बी. आर. गायकवाड यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१२-१३ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (e) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर | सदस्य |
| २) | प्रा. डॉ. बी. एच. कुलकर्णी | सदस्य |
| ३) | श्री. बी. आर. गायकवाड | सदस्य |
| ४) | श्री. एस. एच. रिसबुड | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. डी. डी. पुजारी | सचिव |

सदर उपसमितीने तयार केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.०२/०२/२०१३ रोजी झालेल्या सभेसमोर विषय क्र. ०२ नुसार सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : सन २०१२-१३ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०१३ रोजी झालेल्या सभेत विषय क्र. १२ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत अधिसभेस दुरुस्तीसह मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः श्री. गायकवाड बी. आर. यांच्या वतीने श्री. सलगर बी. एस. यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. जमादार के. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

| | |
|---|---|
| **१) प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए.** | **७) डॉ. बारबोले ए. एन.** |
| **२) श्री. रिसबूड एस. एच.** | **८) डॉ. चव्हाण सी. एस.** |
| **३) डॉ. इंगोले के. जे.** | **९) प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम.** |
| **४) डॉ. गायकवाड एस. पी.** | **१०) डॉ. पवार एन. बी.** |
| **५) प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी.** | **११) प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| **६) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल.** | **१२) डॉ. शिळीमकर टी. एन.** |

**यांनी विचार मांडल्यानंतर सन २०१२-१३ च्या सुधारित अंदाजपत्रकावर व सन २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकावर मुद्देसूद चर्चा झाली व सदर प्रस्ताव दुरुस्तीसह एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ४ ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०११-१२ या वर्षाच्या ८ व्या वार्षिक मराठी अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.

प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वार्षिक अहवाल समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या आठव्या वार्षिक अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी:- सोलापूर विद्यापीठाचा सन २०११-१२ या वर्षाचा ८ वा वार्षिक अहवाल (मराठी) तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | अध्यक्ष |
| २) | डॉ. इंगोल के. जे. | सदस्य |
| ३) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ४) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ५) | डॉ. श्रीमती ॲनी जॉन | सदस्या |
| ६) | श्रीमती चोपडे ए. बी., सहा. कुलसचिव | सदस्य सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०१३ रोजीच्या सभेतील विषय क्र.१० नुसार विचारार्थ ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: सोलापूर विद्यापीठाचा सन २०११-१२ चा वार्षिक मराठी अहवाल दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०११-१२ च्या वार्षिक मराठी अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ).

**ठराव: सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए.**
**२) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल.**
**३) डॉ. पवार एन. बी.**
**४) डॉ. चव्हाण सी. एस.**
**५) डॉ. काशीद एस. एस.**

**त्यानंतर सदरचा प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ५ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठांतर्गत Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांची वार्षीक फी दोन सत्रांमध्ये आकारण्यात यावी अशी शिफारस अधिसभा महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळास करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. सदर प्रस्तावाबाबत एकमत न झाल्याने प्रस्ताव मतदानास टाकला. हात उंचावून मतदान घेतले असता ठरावाच्या बाजूने १० तर विरोधात ३७ मते पडल्याने सदरचा ठराव अमान्य झाला.**

**[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

Ph.D. कोर्सवर्क चा अभ्यासक्रम व त्याची शिर्षके ठराविण्याचा अधिकार संबंधीत B.o.S. व उप समितींचा असावा अशी शिफारस अधिसभा विद्या परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. इंगोले के. जे. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ७ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सामजिक शास्त्र तथा भाषा विषयांच्या करिता आपल्या विद्यापीठात करण्यात आलेली संशोधन मार्गदर्शक व संशोधन विद्यार्थ्यांकरिताचा इंप्कट फॅक्टर ची सक्ती रद्द करावी अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बाड डी. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ८ ] अधिसभा सदस्य डॉ. पवार एन. बी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

M.Phil, Ph.D. च्या डेझरटेशनचे मानधन वाढविण्यात यावे. अशी सिफारस बोर्ड ऑफ एक्झ ाामिनेशन कडे करण्यात येत आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. पवार एन. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ९ ] अधिसभा सदस्य डॉ. इंगोले के. जे. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

पीएच्. डी. प्रंबध व एम्. फिल प्रंबधिका तपासणीचे मानधन वाढविण्यात यावे अशी शिफारस परीक्षा मंडळाकडे करण्यात यावी.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १० ] अधिसभा सदस्य श्री. चौगुले एस. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयात आकारण्यात येणारे शुल्क, शुल्क नियंत्रण समितीने निश्चित केल्या प्रमाणे असल्याबाबत तपासणी करण्यासाठी चौकशी समिती नेमावी अशी सिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात येत आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. चौगुले एस. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ११ ]** **अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

महाविद्यालयाने नव्याने चालू केलेल्या विनाअनुदानित विषय, तुकडी, शाखा, यांना अपिलेशन देताना विद्यार्थीसंख्येनुसार शिक्षकेतर स्टाफ संबंधीत महाविद्यालयाने भरला नसल्यास अशा महाविद्यालयातील विनाअनुदानित विषय, तुकडी, शाखा यांना अपिलेशन देवू नये. म्हणून ही अधिसभा विद्यापरिषदे कडे शिफारस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. कांबळे एन. आर. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १२ ]** **अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ परीक्षा चालू असताना कॅप सेंटरवर पेपरचे गठ्ठे पोहोचविण्यासाठी १०० पेपरच्या पुढे एक शिपाई देण्यात यावा. अशी शिफार ही अधिसभा परिक्षा मंडळाकडे करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. जमादार के. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १३ ]** **अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ परीक्षा मंडळ विद्यार्थ्याकडून परीक्षा फी प्रत्येक वर्ग व सत्रासाठी वेगवेगळी आकारते त्या ऐवजी शिवाजी विद्यापीठाप्रमाणे प्रत्येक वर्ग व सत्रास एक सारखीच फी आकारावी. (उदा. बी.ए. सत्र १ ते ६ साठी परीक्षा फी प्रत्येकी रुपये २५०/-) म्हणून ही अधिसभा परीक्षा मंडळाकडे शिफारस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. कांबळे एन. आर. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १४ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

प्रशासकीय कर्मचारी यांना जादा काम केल्यानंतर देण्यात येणाऱ्या over time च्या दरात वाढ करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. कोळेकर टी. एन. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १५ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठाकडील कर्मचारी व शिक्षक वर्ग यांनी विद्यापीठाकडील कोणत्याही आभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास शैक्षणिक शुल्काच्या ५०% सवलत देण्याबाबत ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस शिफारस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्रा. डॉ. पाटील आर. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. कोळेकर टी. एन. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

**जोडपत्र "अ"**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## प्रश्नोत्तरे

**अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे**

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | **डॉ. चव्हाण सी. एस.** | | **प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | १ | सोलापूर विद्यापीठात सामाजिकशास्त्र विभागात कोणते पारंपारिक विषय सुरु करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाने शासनाकडे पाठविला आहे? | कोणतेही नाही. |
| | | • सामाजिकशास्त्र संकुलातंर्गत काही विषय सुरु करण्याचा मानस आहे काय ? | सध्यातरी मानस नाही. |
| | २ | मागील अधिसभेने प्रश्नपत्रिका तयार करण्याचे मानधन वाढविण्याचा ठराव पास केला होता. त्यावर पुढे काय कार्यवाही करण्यात आली? | अधिसभेच्या ठरावानुसारची मागणी परीक्षा मंडळाने अमान्य केली. |
| | | • अधिसभेचा ठराव परीक्षा मंडळास अमान्य करता येतो का व कोणत्या कलमानुसार? | अधिसभेची सूचना असते ती बंधनकारक नसते. |
| | | • परीक्षा मंडळाने हा ठराव अमान्य केला त्याचे कारण काय असावे ? | मागील परीक्षा मंडळाने नुकतीच वाढ केल्यामुळे लगेच ही वाढ करण्याचा निर्णय अमान्य करण्यात आला. |
| | | • परीक्षेशी संदर्भात मानधन ठरविताना अन्य विद्यापीठामध्ये प्रत्येक गोष्टीला काय मानधन दिले जाते का याचा संदर्भ घेतला जातो काय ? | इतर विद्यापीठाकडील मानधनाचा विचार करुन मानधन वाढविण्याबाबत समितीमध्ये विचार करण्यात येतो. |
| | | • एखाद्या प्रश्नपत्रिकेकरीता ₹१००/- मानधन देणे ज्यावर ₹२०,०००/- पर्यंत दंड होवू शकतो हे विद्यापीठासाठी किंवा प्राध्यापकांच्या अप्रतिष्ठेच नाही काय ? | प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपावरुन मानधन ठरविले जाते. सर्वांचे ₹१००/- मानधन नाही. |
| | | • केवळ ₹१००/- एक प्रश्नपत्रिका काढण्यासाठी दिले जाते हे चुकीचे नव्हे काय ? | प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपावरुन मानधन ठरविले जाते. सर्वांचे ₹१००/- मानधन नाही. |
| | | • प्राध्यापकांना जे सध्या मानधन दिले जाते ते योग्य आहे का असे वाटते का ? | प्रचलित असलेल्या विविध विद्यापीठाकडील मानधनानुसार मानधन ठरविले जाते. |

<table>
<tr><th></th><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td></td><td>३</td><td>एम. फिल. थेरी परीक्षा पास झालेली असल्यास त्या संशोधक विद्यार्थ्यास पून्हा परिक्षा देणे अनिवार्य आहे काय?</td><td>प्रश्न संदिग्ध आहे.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>● एम. फिल. ची थेरी परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यास पीएच.डी. ची कोर्स वर्कची परीक्षा देणे बंधनकारक आहे काय ?</td><td>एम. फिल. डिग्री अवार्ड झाली असेल तरच त्या विद्यार्थ्याला पीएच.डी. कोर्सवर्कची परीक्षा देणे बंधनकारक नाही.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>● परिनियम ९ नुसार एखाद्या एम. फिल. विद्यार्थ्याने जर एम.फिल. चे कन्व्हेशन पीएच. डी. मध्ये केले असेल तर एम.फिल. परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याला पीएच.डी. कोर्स वर्कची आवश्यकता आहे काय ?</td><td>एम.फिल. चे पीएच.डी. पदवीमध्ये कन्व्हर्हशन केले असेल तर आणि एम. फिल. ची परीक्षा पास असेल तर त्याला पीएच. डी. कोर्सवर्कची परीक्षा देण्याची आवश्यकता नाही.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="2"><u>डॉ. कोळेकर टी. एन.</u></td><td><u>ॲड. श्री. सलगर बी. एस.</u></td></tr>
<tr><td></td><td>४</td><td>कुलगुरु निवडीकरिता मा. कुलपतींनी स्थापन केलेल्या कुलगुरु शोध समितीच्या संपुर्ण बैठकांसाठी झालेल्या खर्चाचा तपशिल काय आहे?</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>खर्चाचा तपशील</th><th>रक्कम (₹)</th></tr>
<tr><td>१)</td><td>कुलगुरु शोध समितीच्या सदस्यांचा टी.ए.डी.ए. व राहण्याचा खर्च</td><td>१,७४,०५७/-</td></tr>
<tr><td>२)</td><td>तीन बैठकांच्या वेळीचा खर्च</td><td>२७,९१०/-</td></tr>
<tr><td>३)</td><td>जाहिरात खर्च</td><td>६,०४,३६५/-</td></tr>
<tr><td>४)</td><td>शॉटलिस्टेड उमेदवारांचे कुलगुरु शोध समितीच्या Interaction वेळी देण्यात आलेले टी.ए.बिल</td><td>१,८३,६८१/-</td></tr>
<tr><td>५)</td><td>कुलगुरु शोध समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच नोडल ऑफिसर (त्यांच्या सहकाऱ्यांसह) यांना देण्यात आलेले मानधन / परिश्रामिक खर्च</td><td>१,४०,०००/-</td></tr>
<tr><td>६)</td><td>दि.१०/१२/२०१२ रोजी राजभवन मुंबई महामहीम कुलपती यांच्यासमवेत Interaction करिता उपस्थित राहिलेल्या उमेदवाराचे टी.ए.बिल</td><td>११,३७५/-</td></tr>
<tr><td></td><td>एकूण रक्कम रुपये (₹)</td><td>११,४१,३८८/-</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | **डॉ. इंगोले के. जे.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| | ५ | आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे निकाल महाविद्यालयांना कळविण्यात येतात काय? | होय. |
| | | • स्पर्धा झाल्यानंतर किती दिवसात कळविण्यात येतात? | शैक्षणिक वर्षातील सर्व स्पर्धा संपल्यानंतर व यजमान महाविद्यालयाची आढावा बैठक झालेनंतर एकत्रित रित्या निकाल कळविले जातात. |
| | | • या वर्षी कळविले आहेत काय ? | यावर्षी आणखी स्पर्धा झाल्या आहेत त्याचा रिपोर्ट आलेला नाही. |
| | | • निकाल विद्यापीठाकडून कळविले जातात की नाही ? | स्पर्धा महाविद्यालयाकडे सोपविल्या असल्याने ती महाविद्यालयाची जबाबदारी आहे. |
| | | • या स्पर्धेचे निकाल कोणत्या तारखेस व कोणत्या जावक क्रमांकाने पाठविले आहेत? | माहिती घेवून देण्यात येईल. |
| | | • ही माहिती विद्यापीठाने होस्ट महाविद्यालयाकडून घेवून कळविण्याची गरज नाही काय ? | संबंधित होस्ट महाविद्यालयाची जबाबदारी असल्याने त्या महाविद्यालयाची जबाबदारी आहे. |
| | | • निकाल कळविण्यात येत नसल्यास एक महिन्याच्या आत कळविण्यात यावे? | आंतर महाविद्यालयीन क्रीडा परिषदेच्या स्पर्धा संपल्यानंतर निकाल एक महिन्याच्या आत संलग्न महाविद्यालयांना कळविण्याच्या सुचना यजमान महाविद्यालयांना देण्यात येतील. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)